MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १९ अंक : ४ पाने : ८ जून-जुलै २०२४
www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

जागतिक वातावरणात सातत्याने वेगाने बदल होत आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास व बदललेली जीवनशैली हे त्यामागचे मुख्य कारण आहे. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी व चक्रीवादळे अशा एकामागोमाग एक आलेल्या नैसर्गिक आपत्तींचाही सामना करावा लागला. या आव्हानांच्या काळात महापारेषणच्या कर्मचाऱ्यांनी जनतेची निःस्वार्थ सेवा करण्याचा त्यांचा खरा स्वभाव दाखवला आणि वीजपुरवठ्याची उपलब्धता आणि सातत्य टिकवून ठेवण्यात ते यशस्वी ठरले. वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर सुरक्षितता निश्चित करण्यासाठी आपण अत्यंत चोखपणे काळजी घेतली पाहिजे आणि सर्व प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

- **सांघिक भावनेने काम करा**
- **नैसर्गिक संकटांना तोंड द्या**
- **समर्पित भावनेने काम करा**
- **ऊर्जा क्षेत्रात अग्रगण्य राहू**

जागतिकीकरणात ऊर्जा क्षेत्र खुले झाल्यामुळे आणि खासगी क्षेत्रातील कंपन्या, बहुराष्ट्रीय संस्थांच्या आक्रमक पवित्र्यामुळे आपले अस्तित्व शाश्वत राखण्यासाठीची आव्हाने भविष्यातही आपल्यासमोर उभी ठाकणार आहेत. उपलब्ध संसाधनांचा न्याय्य पध्दतीने वापर करणे, कार्याच्या अंमलबजावणीतील व्यावसायिक कुशलता, प्रकल्पांचे संचलन व देखभाल, उच्चदाब, अतिउच्चदाबाच्या तारांचे जाळे संपूर्ण क्षमतेने वापरणे, संपत्तीची उपलब्धता आणि शाश्वतता टिकवून ठेवणे, सक्रिय आणि प्रतिबंधात्मक चाचण्या आणि देखभालीची मानके इत्यादीसाठी आपल्या कामाच्या परिप्रेक्ष्यात नियोजनबध्द बदल करण्यासाठी आपण तयार राहिले पाहिजे. बहुतांश पारेषण प्रकल्पांनी त्यांचा सेवाकाळ पूर्ण केला आहे किंवा लवकरच पूर्ण करणार आहेत. त्यामुळे अशा प्रकल्पांचे मानकांनुसार संचलन आणि देखभाल करणे हे एक मोठे आव्हान आहे. अभियंते आणि कर्मचाऱ्यांचे मनापासून समर्पण आणि सक्रिय सहभागातून हे साधणे आपल्याला शक्य झाले आहे.

चक्रीवादळे व अतिवृष्टी अशा प्रकारच्या घटनांमध्ये भूतकाळात मोठी वाढ झाली होती. विविध आंतरराष्ट्रीय संशोधनांनुसार जागतिक तापमानवाढीमुळे विशेष करून अरबी समुद्रात पूर्वी जे कधीच आढळले नाही ते म्हणजे वादळांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. त्यासोबतच हवामानविषयक अन्य बदलही वेगाने घडत आहेत. आग, चक्रीवादळे आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे वित्तहानी, देखभाल-दुरुस्तीच्या खर्चात वाढ, वीजपुरवठा बंद पडण्याची शक्यता अशा घटना यामुळे संभवतात. चक्रीवादळामुळे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील अनवली गावात २२० के. व्ही. लांबोटी-पंढरपूर व २२० के. व्ही. लांबोटी-करकंब या अति उच्च दाब वाहिनीचे सहा मनोरे कोसळले होते. छत्रपती संभाजीनगर परिमंडळात गिरवली विभागांतर्गत येणाऱ्या अतिउच्चदाब वाहिनीचे सहा मनोरे नंदागौळ आणि अंबलवाडीच्या अतिदुर्गम डोंगरामध्ये कोसळले. मात्र, आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर काम करून वीजपुरवठा सुरळीत केला, ही खरंच कौतुकाची बाब आहे, त्यासाठी मी तुमचे मनापासून अभिनंदन करतो.

विजेच्या संदर्भातील पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने असलेला धोका टाळण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि ऊर्जा मंत्रालयाने जारी केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्याचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

चक्रीवादळे, पूर आदींमुळे असलेला संभाव्य धोका टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांमध्ये आवश्यक बदल, सुधारणा करणे आवश्यक आहे. उदा. आगीच्या धोक्यापासून वाचण्यासाठी आवश्यक उपकरणे, साधने पुरविणे यासारख्या बाबींची सध्याच्या धोरणांच्या सुसंगत पध्दतीने विचार करून पूर्तता करणे आवश्यक आहे.

आपल्या कंपनीमध्ये सगळीकडे वापरण्यात येणाऱ्या स्काडा आणि इतर नव्या तंत्रज्ञानांमुळे क्लाऊड कम्प्युटिंग, डेटा वेअरहौसिंग यासारख्या गोष्टींचा वापर करावा लागतो. या तंत्रज्ञानांशी रिमोटवरून सहज जोडता येणे शक्य असल्यामुळे त्यांच्याबाबत सायबर धोकाही संभवतो. तसेच वीज हा ऊर्जेचा सर्वांत महत्त्वाचा स्रोत असल्याने ऊर्जा हे क्षेत्र सायबर हल्ल्यांचे संभाव्य `लक्ष्य` बनले आहे. त्यामुळे ऊर्जा प्रकल्प, अति उच्चदाबासाठीच्या



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

पायाभूत सुविधा, जसे की इएचव्ही उपकेंद्रे, दाब वहन केंद्रांवरही हॅकर्स किंवा शत्रूराष्ट्राकडून सायबर हल्ल्याची शक्यता नाकारता येत नाही. आयटी यंत्रणेची सुरक्षितता, एकाहून अधिक सर्व्हर्सवर डेटा ठेवणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो भारतीय सर्व्हरवर ठेवणे आवश्यक आहे.

अति उच्चदाबाच्या उपकेंद्राचे योग्य संचलन आणि देखभालीसाठी मनुष्यबळाच्या पुरेपूर वापरासह स्काडा हे सर्वांत महत्त्वाचे साधन आहे. ग्रिडचे व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यासाठी अति उच्चदाबाच्या उपकेंद्राचा डेटा राज्य भार प्रेषण केंद्रावरही दिसणे आवश्यक आहे.

प्रकल्पांचे प्रभावी नियोजन व कार्यान्वयन करण्यासाठी महापारेषणने वित्त, विधी आणि मुख्य प्रकल्प व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिकांचा समावेश असलेली प्रकल्प व्यवस्थापन सल्ला सेवा संस्थेची मदत घ्यावी. भविष्यातही महापारेषणचा लौकिक वाढवायचा आहे. त्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकदिलाने, समर्पित भावनेने काम करायचे आहे. सांघिक प्रयत्नांमुळेच ऊर्जा क्षेत्रात आपण सतत आघाडीवर राहू, याबाबत माझ्या मनात शंका नाही.

**शुभेच्छांसह..!**

**– डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक





**मुंबई :** सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महानिर्मिती, महावितरण व महापारेषण या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्यासाठी आयोजिलेल्या बैठकीत बोलताना उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस.

### ▶ मूळ वेतनात १९ टक्के व सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ

# वीज कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ : उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

Follow us on :

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्के व सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ देण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस बोलत होते.

या बैठकीस ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र,महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार या तिन्ही कंपन्याचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी तसेच संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले,``तिन्ही वीज कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मूळ वेतनामध्ये १९ टक्के व सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ देण्याचे मान्य केले आहे. तसेच सहाय्यकांना परिविक्षाधीन कालावधीकरिता पाच हजार रुपयांची वाढ आणि तांत्रिक कर्मचारी यांना मिळणारा रू.५००/-चा भत्ता आता रु.१०००/- इतका करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco @maha_transco MahaTransco
MahaTransco Mahatranscoltd MahaTransco




**मुंबई :** महापारेषणच्या १९ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात विजेत्यांचा सत्कार करताना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक. शेजारी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे.

## राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ थाटात

# महापारेषणचा १९ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा १९ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते विजेत्यांना प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

वांद्रे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे उपस्थित होते.

सुरूवातीला उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. प्रास्ताविकात महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे म्हणाले, ``कंपनीची संस्कृती व कर्मचाऱ्यांमध्ये एकसंघ वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येणे, सकारात्मक विचारांची देवाणघेवाण करणे, मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करून कंपनीचा विकास साधावा, या हेतूने महापारेषणतर्फे कंपनीचा १९ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना



**मुंबई :** महापारेषणचा १९ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात बोलताना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक.




**मुंबई :** महापारेषणच्या १९ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात विजेत्यांचा सत्कार करताना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक. शेजारी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे.

वाव मिळावा, हा त्यामागचा हेतू आहे.

डॉ. संजीव कुमार म्हणाले, ``महापारेषण ही देशात सर्वोत्तम पारेषण कंपनी आहे. महापारेषणने ड्रोनचा वापर सुरू केला आहे. हा ड्रोनचा वापर हा विशेषतः दुर्गम भागातील अति उच्च दाब वाहिन्यांचे वेळेवर सर्व्हेक्षण व देखरेख करण्यासाठी चांगला निर्णय ठरला आहे. महापारेषणच्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उपविभाग स्तरापासून सांघिक कार्यालय स्तरापर्यंत पुरस्कार योजना सुरु केली आहे. भविष्यातही अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही पुरस्कार योजना चालू राहील.``

ऊन-पावसाची तमा न बाळगता विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम यावेळी सादर केले. जनसंपर्क विभागाच्या समन्वयातून महापारेषणच्या सर्वंकष कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या चित्रफितीने वातावरण ऊर्जामय झाले. प्रसिध्द गायक श्रीकांत नारायण व उत्तरा केळकर यांच्या गीतांनी कार्यक्रमाला बहार आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन, मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता श्री. संजीवकुमार बद्देला, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्री. स्वप्नील साळुंखे, संचालक (मानव साधन) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर, रेणुका नाटके यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला राज्यातील विविध परिमंडळातील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. महेश आंबेकर यांनी मानले.

थेट-भेट

## स्वीचयार्डची पाहणी करुन घेतला कामकाजाचा आढावा

# चाकणमधील ४०० के. व्ही. ग्रहण केंद्राला अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांची भेट

Follow us on :



**पुणे :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी चाकणमधील ४०० के. व्ही. ग्रहण केंद्राला भेट दिली. याप्रसंगी पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, अधीक्षक अभियंता सर्वश्री विठ्ठल भुजबळ, जयंत कुलकर्णी, प्रकाश कुरसंगे, संदीप हाके, सुहास पाटील व अन्य अधिकारी.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी चाकणमधील ४०० के. व्ही. ग्रहण केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी ४०० के. व्ही. व २२० के. व्ही. स्वीचयार्डची पाहणी करुन कामकाजाचा आढावा घेतला. अध्यक्षांनी ग्रहण केंद्राच्या देखभाल, अपग्रेडेशन आणि सुरक्षा व्यवस्थापनाबाबत कर्मचाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्यांनी अधिकाऱ्यांसमवेत ग्रहण केंद्रामधील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत आणि भविष्यातील योजनांबद्दल चर्चा केली.

या भेटीदरम्यान ग्रहण केंद्राच्या कार्यक्षमता आणि विश्वसनीयता वाढविण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनांवर भर देण्यात आला. अध्यक्षांनी ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र, चाकण व त्या अंतर्गत येणा-या विद्युत वाहिन्यावरील वाढता भार लक्षात घेता विद्युत प्रणाली सक्षम करण्याकरिता कोणती पावले उचलण्यात यावीत आणि प्रणालीत कोणते बदल करण्यात यावेत, याबाबत मार्गदर्शन केले. त्याकरिता भविष्यातील प्रस्तावित प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करावे, अशा सूचना केल्या. सद्यस्थितीत कार्यरत व प्रगतिपथावर असणा-या ४०० के. व्ही. आर. आर. एस., १२५ एम.व्ही.ए.आर रिॲक्टर, ५० एम.व्ही.ए. रोहित्र या प्रकल्पांचा देखील त्यांनी आढावा घेतला. विशेषतः ४०० के.व्ही. चाकण-तळेगाव (पीजीसीआयएल) या वाहिनीवरील भार कमी करण्याकरिता तात्काळ उपाययोजनांबाबत चर्चा या ठिकाणी करण्यात आली. तसेच ४०० के. व्ही. चाकण ग्रहण केंद्राच्या नियंत्रण कक्षाच्या इमारतीवर आस्थापित करण्यात आलेल्या ११० कि. वॅट क्षमतेच्या पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्पाची पाहणी करुन त्याच्या उपयोजितेबद्दल माहिती घेतली. सदर भेटीदरम्यान त्यांनी उपकेंद्रासाठी आवश्यक असणारे क्षेत्र आणि उभारणीकरिता येणा-या अडचणी या बाबी विचारात घेता जी. आय. एस. ग्रहण केंद्र उभारण्याबाबत मार्गदर्शन केले. या भेटी दरम्यान डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते ग्रहण केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. अनिल कोलप, अधीक्षक अभियंता सर्वश्री श्री. विठ्ठल भुजबळ, श्री. जयंत कुलकर्णी, श्री. प्रकाश कुरसंगे, श्री. संदीप हाके, श्री. सुहास पाटील, कार्यकारी अभियंता आणि त्यांच्या विभागातील इतर अभियंते व अधिकारी उपस्थित होते.

शिक्षण-प्रशिक्षण

## भाईंदरमधील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत आयोजन

# महापारेषणच्या वतीने ऊर्जा कंपन्यांच्या वाहनचालकांसाठी कार्यशाळा

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या वतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही कंपन्यांतील वाहनचालकांसाठी दोन दिवसीय कार्यशाळा भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक यांच्या हस्ते झाले. यावेळी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे उपस्थित होते. यावेळी बोलताना श्री. पाठक म्हणाले, ``कंपनीच्या प्रगतीमध्ये वाहनचालकांची महत्त्वाची भूमिका आहे. वाहनचालकांची जबाबदारी ही हवाई जहाज, रेल्वेचा लोको पायलट यांच्याएवढीच महत्त्वपूर्ण आहे. तिन्ही वाहनचालकांच्या काही समस्या असतील तर त्या जाणून घ्या व त्याचे निराकरण करण्याबाबतची कार्यवाही प्रशासनस्तरावर करण्यात यावी. तसेच वाहनचालकांच्या वैद्यकीय तपासण्या करणे आवश्यक आहे.''

सुरूवातीला श्री. सुगत गमरे यांनी प्रास्ताविकात महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपन्या जरी वेगळ्या झाल्या असल्या तरी संस्कृती व कार्यप्रणाली एकसारखीच असल्याने सर्व वाहनचालकांची एकमेकांमध्ये विचारांची देवाण-घेवाण व्हावी, परस्पर सहकार्य रहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी महापारेषणचे महाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. संजीवकुमार बद्देला, वरिष्ठ व्यवस्थापक (प्रशिक्षण) श्री. स्वप्नील साळुंखे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर यांनी मानले.





**भाईंदर :** येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत महापारेषण कंपनीच्या वतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही कंपन्यांतील वाहनचालकांसाठी आयोजिलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) सर्वश्री विश्वास पाठक. शेजारी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील,अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) संजीवकुमार बद्देला. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित प्रशिक्षणार्थी.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in

Team Work

अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे वीजपुरवठा सुरळीत

# चक्रीवादळामुळे सोलापुरात कोसळलेल्या विद्युत मनोरे उभारणीचे काम वेगाने

Follow us on :









**अनवली (ता. पंढरपूर) :** चक्रीवादळ व मुसळधार पावसामुळे अनवली गावच्या शिवारात सहा मनोरे कोसळले. मात्र, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर काम करून वीजपुरवठा सुरळीत व पूर्ववत केला.

सोलापूर जिल्ह्यात चक्रीवादळ आणि मुसळधार पावसामुळे पंढरपूर तालुक्यातील अनवली गावच्या शिवारात महापारेषण कंपनीचे २२० के. व्ही. लांबोटी-पंढरपूर व २२० के.व्ही. लांबोटी-करकंब या अति उच्च दाब वाहिनीचे ६ मनोरे कोसळल्याने पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, अकलूज या तालुक्यांना होणारा विद्युत पुरवठा खंडित झाला. दरम्यान, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे वीजपुरवठा तात्काळ सुरू करण्यात आला.

ही वाहिनी १९८० पासून कार्यान्वित असून ती कोसळल्यामुळे पंढरपूर व आसपासच्या तालुक्यातील विद्युत भार व्यवस्थापन करण्यामध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. या तालुक्यामध्ये प्रामुख्याने शेती व्यवसाय असल्याने डाळिंब, द्राक्षे आणि ऊस ही प्रमुख पिके घेतली जातात. शेतीमालाचे नुकसान होऊ नये याकरिता वाहिन्यांची उभारणी जलद गतीने करणे आणि पर्यायी मार्गाने विद्युत पुरवठा कसा सुरू होईल, यासाठी

पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत करून कोसळलेल्या ६ मनो-यांची पायाभरणी, मनोरा उभारणी आणि तारा ओढणीचे काम विक्रमी वेळेत पूर्ण करुन विद्युत पुरवठा सुरळीत करून पूर्ववत केला.

विद्युत मनोरे कोसळल्याने महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेऊन सूचना दिल्या. तसेच महापारेषण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी घटनेची माहिती घेतल्यानंतर तातडीने विद्युत पुरवठा सुरळीत करण्याकरिता निर्देश दिले. प्रत्यक्ष घटनास्थळी मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप आणि प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रकाश कुरसंगे यांनी भेट दिल्यानंतर कोसळलेल्या मनो-यांची उभारणी जलद गतीने व्हावी, म्हणून उभारणीसाठी लागणारी साहित्य सामुग्रीचे नियोजन करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्याबाबत प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेऊन तातडीने मनुष्यबळ, विविध साहित्य यांचे नियोजन केले. काम लवकर पूर्ण होण्यासाठी ते प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी तळ ठोकून होते.

दरम्यान, खबरदारीचा उपाय म्हणून आणि भारनियमन टाळण्यासाठी सुमारे २०० मेगावॅट इतका भार नजिकच्या उपकेंद्रावर वळविण्यात आला. तसेच विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे वीजग्राहक व शेतकऱ्यांना पर्यायी व्यवस्था म्हणून कराड परिमंडळातील २२० के. व्ही. विटा उपकेंद्रातून विद्युत पुरवठा करण्यात आला.

या कामाकरिता सोलापूर मंडळातील अधीक्षक अभियंता श्री. राम शेळके, कार्यकारी अभियंता श्री संजय सोनपेठकर, कार्यकारी अभियंता श्री. अमित शिंदे तसेच श्री अजित गायकवाड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, वाहिनी देखभाल उपविभाग, पंढरपूर येथील इतर अभियंते, अधिकारी व त्यांच्या उपविभागातील तांत्रिक कर्मचा-यांनी युध्दपातळीवर अहोरात्र काम केले.

या कामी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने सोलापूर मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त वाहिनी उभारणीसाठी नेमलेल्या वाहिनी देखभाल एजन्सी मेसर्स ए. बी. पॉवर पुणे, मेसर्स श्री. स्वामी समर्थ पॉवर इलेक्ट्रिकल्स प्रायव्हेट लिमिटेड पुणे, श्री. सुयोग इलेक्ट्रीकल्स सोलापूर, मेसर्स ए. बी. पॉवर कोल्हापूर या एजन्सीने मनोरे उभारणीच्या कामी त्यांचे सहाय्य घेण्यात आले.

या मनोरा पुनर्रउभारणीच्या कार्यामुळे या वाहिनीव्दारे होणारा विद्युत पुरवठा पूर्ववत झाला. महापारेषण कंपनीच्या तांत्रिक टीमचे आणि अभियंत्यांचे कार्य कौतुकास्पद ठरले असून त्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अनेकांना दिलासा मिळाला.

Review Meeting



**छत्रपती संभाजीनगर :** येथील परिमंडळात आयोजिलेल्या आढावा बैठकीनंतर महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या समवेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकत्रित छायाचित्र काढले. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, अधीक्षक अभियंता सर्वश्री संजीवकुमार सुरडकर, संजीव कांबळे, दत्ता जाधवर, रंगनाथ चव्हाण व श्रीमती अंजना ठक्कर व अन्य अधिकारी.

## ▶ कामे तातडीने करण्याचे डॉ. संजीव कुमार यांचे निर्देश

# महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी घेतला छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचा आढावा

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर परिमंडळांतर्गत विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर आहेत. ती कामे तातडीने करण्याचे निर्देश महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर परिमंडळात आयोजिलेल्या आढावा बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना कामाच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सूचना केल्या. या बैठकीला संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, अधीक्षक अभियंता सर्वश्री संजीवकुमार सुरडकर, संजीव कांबळे, दत्ता जाधवर, रंगनाथ चव्हाण व श्रीमती अंजना ठक्कर तसेच परिमंडळातील सर्व कार्यकारी अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांनी छत्रपती संभाजीनगर परिमंडळांतर्गत सुरु असलेल्या कामकाजाबद्दल पॉवरपॉईंटव्दारे सादरीकरण करून माहिती दिली.

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांची विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन त्वरित करावयाची कामे व दीर्घकालीन कामे अशी वेगवेगळ्या पर्यायावर चर्चा केली. यावर छत्रपती संभाजीनगर व इतर जिल्ह्यातील पारेषण प्रणाली सुरळीत अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक कामाची सूची तयार करून ती प्राधान्यक्रमाने अंमलात आणण्याचे निर्देश अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी दिले.

तसेच उपकेंद्र व वाहिनी उभारणीकरिता प्रकल्पांचे पूर्वनियोजन करावे जसे की, परिपूर्ण सर्वेक्षण, अचूक अंदाजपत्रक, वनविभाग परवानगी, राष्ट्रीय महामार्ग व राज्यमार्ग परवानगी, वीज आणि दूरसंचार यंत्रणा समन्वय समितीची परवानगी, नागरी उड्डाण विभाग परवानगी, रेल्वे विभाग परवानगी इत्यादी सर्व कामे निविदा प्रक्रिया राबविण्यापूर्वी किंवा कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी पूर्ण करावीत, जेणेकरुन प्रकल्पांची कामे नियोजित वेळेत व मंजूर रक्कमेनुसार पूर्ण होतील. प्रकल्पांची कामे सुरळीत पार पाडण्याकरिता प्रकल्पांच्या निगडीत काम करणाऱ्या सर्व भागधारकांची नियमित आढावा बैठक घेऊन येणाऱ्या अडचणींचे निराकरण करून प्रकल्प वेळेत पूर्ण होतील, याची खबरदारी घेण्याचे निर्देश दिले.

या आढावा बैठकीत अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी पूर्ण झालेल्या प्रकल्पांचे वेळेत भांडवलीकरण करण्याबाबत सूचना दिल्या. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले.


आमच्याशी कनेक्टेड रहा

@maha_transco @maha_transco MahaTransco

MahaTransco Mahatranscoltd MahaTransco

Appointment

# महापारेषणच्या संचालकपदी (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर यांची नियुक्ती

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) संचालक (वित्त) पदाचा कार्यभार श्रीमती तृप्ती नितीन मुधोळकर यांनी १९.०७.२०२४ रोजी घेतला. संचालक (वित्त) या पदावर विराजमान होणाऱ्या त्या महापारेषणच्या पहिल्या महिला अधिकारी आहेत.

यापूर्वी त्यांनी महानिर्मिती कंपनीच्या मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून मुख्यालय, मुंबई येथे काम पाहिले होते. चार्टर्ड अकाऊंटंट पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या ऑगस्ट १९९६ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ४०० के. व्ही. विभागीय कार्यालय, नागपूर येथे व्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून रुजू झाल्या. त्यानंतर महानिर्मितीच्या स्थापत्य विभाग खापरखेडा, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र, अंतर्गत लेखा विभाग नागपूर, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, बांधकाम विभाग कोराडी आणि मुख्यालय मुंबई इत्यादी ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर त्यांनी यशस्वीरीत्या काम केले आहे. व्यवस्थापक (वित्त व लेखा) ते मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अशा विविध महत्वपूर्ण पदांवर त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला होता.

महानिर्मितीमध्ये त्यांना स्थापत्य, प्रकल्प, संचलन व सुव्यवस्था, अंतर्गत लेखा परीक्षण, कॉर्पोरेट अकाऊंटसचा मोठा अनुभव आहे. तसेच महापारेषण कंपनीत 'वित्तीय तज्ज्ञ' म्हणून त्या संचालकपदी कार्यरत होत्या. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी महानिर्मितीच्या सेवेतून त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या.



## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे जून - जुलै २०२४

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | शशांक जेवळीकर | कार्यकारी संचालक (महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र), म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्यादित | महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली | १८.०७.२०२४ |
| २. | संजय काटकर | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडल, अकोला | १६.०७.२०२४ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती वर्षा मानकर | अधीक्षक अभियंता (पारेषण) | प्रकल्प योजना विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.०६.२०२४ |
| २ | मिलिंद बनसोडे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडल, परळी वैजनाथ | ३०.०६.२०२४ |
| ३ | प्रफुल्ल अवघड | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडल, अकोला | ३०.०६.२०२४ |

**Mahatransco Anniversary** ▶ विविध कार्यक्रमांचे आयोजन; महिलांचा सत्कार

# छत्रपती संभाजीनगर परिमंडळात महापारेषणचा १९ वा वर्धापनदिन उत्साहात

Follow us on :

महापारेषणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडळात महापारेषणचा १९ वा वर्धापनदिन व महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापनदिनी विजेत्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

महापारेषण कर्मचाऱ्यांसाठी डॉ. हेडगेवार रूग्णालयाच्या वतीने हर्सुल येथील प्रशासकीय इमारतीत आरोग्य शिबिर घेण्यात आले. यामध्ये सुमारे २६० कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला. तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार येथे महिला दिन घेण्यात आला. या कार्यक्रमास उद्‌घाटक म्हणून महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण होते.




**छत्रपती संभाजीनगर :** महापारेषणच्या १९ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजिलेल्या पारितोषिक वितरण समारंभाचे दीपप्रज्वलन करून उद्‌घाटन करताना जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी. शेजारी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे.




**छत्रपती संभाजीनगर :** महापारेषणच्या १९ व्या वर्धापनदिनी आयोजिलेल्या महिला दिनानिमित्त बोलताना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण. शेजारी उपजिल्हाधिकारी डॉ. अंजली धानोरकर, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, अधीक्षक अभियंता श्रीमती अंजना ठक्कर.

प्रमुख व्याख्यात्या म्हणून उपजिल्हाधिकारी डॉ. अंजली धानोरकर होत्या. याप्रसंगी महापारेषणच्या मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षक अभियंता श्रीमती अंजना ठक्कर यांनी केले. या कार्यक्रमास मराठवाड्यातील महिला अधिकारी व कर्मचारी त्यांच्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या मागे एका स्त्रीचा हात असतो आणि अशा या कर्तबगार स्त्रियांचा आदर करून त्यांना कामात मदत करणे, हाच खऱ्या अर्थाने महिला दिन ठरेल, असे मत संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांनी मांडले. `घेऊन उंच भरारी मी माणूसपण जपणार आहे आणि असेल पुनर्जन्म तर पुन्हा बाईपण मागणार आहे.` अशा सुंदर शब्दात स्त्रियांची महती सांगत मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी यांनी उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या.

प्रमुख व्याख्यात्या डॉ. अंजली धानोरकर यांनी स्त्रियांना प्रोत्साहित करण्यासाठी अनुरिमा सिन्हा, इरा सिंघल, लताबाई करे यांची उदाहरणे देत या तिघींनीही कठीण परिस्थितीशी सामना करत कशा प्रकारे यशाची शिखरे गाठली, हे सांगितले. तसेच पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत असताना महिलांनी व पुरुषांनी कोणती काळजी घ्यावी, जेणेकरून नुकतेच बाळसं धरू लागलेल्या `महिला सक्षमीकरणा`ला गालबोट लागणार नाही.

या कार्यक्रमात महिला दिनाचे औचित्य साधून विशेष कामगिरी केलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये महिला कबड्डी संघ तांत्रिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या प्रातिनिधिक महिलांचा व समाजसेवेसाठी दैनिक केसरीच्या वतीने जाहीर झालेल्या `आयडॉल महाराष्ट्र` प्राप्त उपकार्यकारी अभियंता श्रीमती सीमा गाडेकर यांचा सत्कार डॉ. अंजली धानोरकर यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित असणाऱ्या सर्व महिलांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आभार अधीक्षक अभियंता श्री. संजीवकुमार सुरडकर यांनी मानले.

या कार्यक्रमानंतर दुपारच्या सत्रात कर्मचाऱ्यांच्या मनोरंजनासाठी डॉ. लक्ष्मण देशपांडे लिखित `वऱ्हाड निघालंय लंडनला` हे एकपात्री नाटक अभिनेता श्री. संदीप पाठक यांनी सादर केले.

पारितोषिक वितरण समारंभ जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी म्हणाले, ``महापारेषण ही अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जाणारी कंपनी आहे. जीवनात अन्न, वस्त्र व निवारा यांची जेवढी आवश्यकता आहे, तेवढीच आवश्यकता विजेची आहे. देशाच्या विकासात विजेचा मोठा वाटा आहे म्हणून या क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी विद्युत विभागातील नोकरी म्हणजे फक्त उदरनिर्वाहाचे साधन म्हणून सीमित विचार न करता आपल्याला या क्षेत्रात जी काम करण्याची संधी मिळाली आहे त्याचं सोनं करण्याचा प्रयत्न करावा. दुसरे महत्त्वाचे म्हणजे नोकरी करणाऱ्या कुठल्याही व्यक्तीच्या आयुष्यातील मोठा कालावधी हा त्याच्या कार्यालयात सोबत काम करणा-या व्यक्तींसोबत जात असतो. त्यामुळे आपापसात समन्वय ठेऊन प्रत्येकाने आपण सर्व एक आहोत या भावनेने व निकोप वृत्तीने काम केल्यास सद्यस्थितीत होत आहे, त्यापेक्षा जास्त काम होऊ शकते, असा विश्वास व्यक्त केला.

पारितोषिक वितरण कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर परिमंडळातील राज्यस्तरीय व्दितीय पुरस्कार मिळालेल्या स्वयंचलन आणि दूरसंचार विभाग छत्रपती संभाजीनगर व मानव संसाधन, परळी या दोन समूहांना जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच परिमंडळांतर्गत प्रथम व व्दितीय अशा एकूण २५ समूहांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी `स्वरसाधना` या संगीत रजनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कर्मचाऱ्यांनी मराठी व हिंदी गाणी सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांनी MERC च्या मानांकनाप्रमाणे System Availability ही ९९.७५% असायला हवी. परंतु, अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, महापारेषण, छत्रपती संभाजीनगर परिमंडळाची System Availability ही ९९.९१% म्हणजे जास्त आहे. तसेच वीज पारेषणातील वीजहानी मानांकनाप्रमाणे २.८९% पेक्षा कमी असायला हवी, ती छत्रपती संभाजीनगर परिमंडळाची २.७८% आहे. शेवटी कार्यक्रमाचे आभार श्रीमती अंजना ठक्कर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता सर्वश्री मिलिंद बनसोडे, संजीवकुमार सुरडकर, संजीव कांबळे, दत्ता जाधवर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. बलराज पारिपेल्ली, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. प्रवीण यशवंते यांनी परिश्रम घेतले.


**संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)**

E-mail : prohr@mahatransco.in

**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)**

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.